

# पुरके, प्रा. वसंत चिंधुजी

**मा. उपाध्यक्ष,**
**महाराष्ट्र विधानसभा**

| | | |
|---|---|---|
| **जन्म** | : | ३ मे १९५६. |
| **जन्म ठिकाण** | : | आटमुर्डी, तालुका राळेगाव, जिल्हा यवतमाळ. |
| **शिक्षण** | : | एम.ए. (मराठी), एच.डी.एड. |
| **ज्ञात भाषा** | : | मराठी, हिंदी व इंग्रजी. |
| **वैवाहिक माहिती** | : | विवाहित, पत्नी श्रीमती प्रेमलता. |
| **अपत्ये** | : | एकूण २ (एक मुलगा व एक मुलगी). |
| **व्यवसाय** | : | अध्यापन व शेती. |
| **पक्ष** | : | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस (आय). |
| **मतदारसंघ** | : | ७७-राळेगाव (अनुसूचित जमाती), जिल्हा यवतमाळ. |
| **इतर माहिती** | : | राळेगाव तालुक्यातील रस्ते, पाणीपुरवठा व जलसिंचनाच्या कामाला प्राधान्य; बेंबळा प्रकल्पाच्या कामासाठी सतत पाठपुरावा; राळेगाव येथे यवतमाळ जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी जलसिंचन मार्गदर्शन शिबिरांचे आयोजन; यवतमाळ, कळंब, राळेगाव येथे शेतकऱ्यांसाठी कृषी तज्ज्ञांच्या उपस्थितीत कृषी शिबीरांचे आयोजन; आदिवासींच्या खावटी कर्ज योजना, स्वयंरोजगार योजना तसेच, कोलाम आदिवासींसाठी घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न; महिलांच्या दारुबंदी उपक्रमास प्रोत्साहन; मार्च २००४ मध्ये दिग्रस येथे मा. सोनियाजी गांधीच्या उपस्थितीत बंजारा समाज मेळाव्याचे आयोजन; पक्षसंघटना मजबुतीसाठी अनेक युवा मेळाव्यांचे आयोजन; २००५ पासून सदस्य, अखिल भारतीय काँग्रेस कमिटी; २००५ सदस्य, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी; उपाध्यक्ष, यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटी; १९९५-९९, १९९९-२००४, २००४-२००९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा; सदस्य, अनुसूचित जमाती कल्याण समिती; समिती प्रमुख, सार्वजनिक उपक्रम समिती; राष्ट्रकुल संसदीय मंडळ, महाराष्ट्र शाखेतर्फे २००१-२००२ चा विधानसभेतील "उत्कृष्ट भाषण" पुरस्कार प्राप्त; २०१० मध्ये मराठा सेवा संघातर्फे 'मराठा विश्वभूषण' पुरस्काराने सन्मानित; जानेवारी २००३ ते ऑक्टोबर २००४ रोजगार व स्वयंरोजगार, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्गीयांचे कल्याण खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २००४ ते डिसेंबर २००८ शालेय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण खात्याचे मंत्री; समिती प्रमुख, केंद्रीय शिक्षणविषयक सल्लागार समिती, नवी दिल्ली; ऑक्टोबर २००९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड; ; ४ डिसेंबर २०१० रोजी महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड. |
| **परदेश प्रवास** | : | नोव्हेंबर २००३ मध्ये सिंगापूर व मलेशियाचा अभ्यास दौरा. |
| **छंद** | : | वाचन व शास्त्रीय संगीत गायन. |
| **पत्ता** | : | (१) प्राध्यापक कॉलनी, दर्डानगर,<br>यवतमाळ - ४४५००१.<br>दूरध्वनी (०७२३२) २४४७५३, २३९२०७.<br>(२) जनसंपर्क कार्यालय, रॉयल पॅलेस, अमरावती रोड, यवतमाळ.<br>(३) रुम नं. ६२३, आमदार निवास, आकाशवाणी समोर, मुंबई. |